॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१२ ( प्रतिनिधी) : पीएम उषा अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र ,कला व मानव विद्या प्रशाळेच्यावतीने दिनांक १८ मार्च २०२६ रोजी विद्यापीठात "क्रीडा सृष्टीमध्ये भारतीय सृष्टी " एकदिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.नॉलेज पार्टनर म्हणून क्रीडा भारती सहभागी होणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत शारीरिक शिक्षण व खेळ ,संतुलित आहार ,क्रीडा शासनाच्या योजना तसेच खेळातून रोजगाराच्या संधी याची माहिती देऊन भविष्यातील दिशा निर्माण करणे या दृष्टिकोनातून राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत अखिल भारतीय महामंत्री क्रीडा भारती पुणे येथील केशव चौधरी यांचे बीज भाषण होणार आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात क्रीडा धोरणांचा अंतर्भाव या विषयावर नागपूर येथील डॉ.निरव पांड्या, भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.प्रा.दयानंद कांबळे, क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी या विषयावर जळगाव येथील क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक तर क्रीडा धोरणे आणि भारतीय क्रीडा सृष्टीचा विकास या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील अमृत बिराडे मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यापीठात होणाऱ्या एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेत सहभागी व्हावे असे आवाहन मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कला व मानव्य विद्या प्रशाळेचे संचालक प्रा. राम भावसार, क्रीडा भारतीचे जिल्हा मंत्री प्रशांत जगताप, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, प्रा. शरद पाटील, डॉ. संजय चौधरी, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सुरेश थरकुडे यांनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ | दिनांक: १२ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता